स्वामी स्वरूपानंद सह. पतसंस्था, रत्नागिरी यांचे मुखपत्र

# स्वरूप सहकार

ऑक्टोबर २०२५



## स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेसारखी शिस्तबद्ध सहकारी संस्था राज्यात नाही

- प्रवीण दरेकर

## साधनांचा सर्वोत्तम उपयोग हाच स्वरूपानंद पतसंस्थेच्या यशाचा खरा मानदंड

- ॲड. दीपक पटवर्धन






## पतसंस्थेच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेला नेहमीप्रमाणेच उत्तम प्रतिसाद







मायदेश फाउंडेशनचे मुख्य प्रवर्तक श्री. अरुण जोशी आणि संचालक श्री. संजय कुलकर्णी यांनी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली. त्या वेळी अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांचा सन्मान केला.






कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती म्हणून संदीप सुर्वे यांची निवड झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड दीपक पटवर्धन ॲड. दीपक पटवर्धन यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे संचालक शरदचंद्र लेले यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सन्मान करून त्यांना शुभेच्छा देताना संस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन आणि सर्व संचालक.





टिळक आळी गणेशोत्सव मंडळातर्फे शताब्दी महोत्सव योगदानाबद्दल पतसंस्थेचा सन्मान करताना मंडळाचे अध्यक्ष शशिकांत काळे, कार्यकर्ते सचिन करमरकर आणि रत्नाकर जोशी आदी.

## संपादकीय

# राष्ट्रीय अर्थकारण गतिमान करण्यासाठीचं योगदान

सहकार हा सर्वांच्या सहकार्याने मार्गक्रमण करत असतो. शासकीय यंत्रणेची, साधनांची मदत न घेता स्वतःच स्वतःचं अस्तित्व तयार करून सहकारी संस्थांची नोंदणी होते. सभासदांचा सहयोग घेऊन भांडवल उभारणी करून आणि आपले उद्दिष्ट निश्चित करून सहकारी संस्था स्वतःची व्यवस्था उभी करते. लोकशाही कार्यपद्धतीचा अवलंब करून व्यवस्थापक मंडळाच्या माध्यमातून संस्था कार्यरत होते. या संपूर्ण प्रक्रियेत केवळ सहकार खात्याच्या माध्यमातून होणारी नोंदणी वगळता शासनाची कोणतीही मदत, साधनं न वापरता स्वावलंबी पद्धतीने सहकारी संस्थांनी काम करणं अपेक्षित असतं.

स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेनेही याच स्वावलंबी पद्धतीचा अंगीकार केला आणि हळूहळू आपला जम बसवला, विश्वास निर्माण केला. सभासदांना जोडताना संस्थेच्या उपक्रमांतून स्वरूपानंद पतसंस्थेची ओळख, जनसंपर्क वाढवत नेला. हळूहळू जनमानसात संस्थेची प्रतिमा निर्माण होऊ लागली. चांगले आर्थिक रिझल्ट देणारी, शिस्तबद्ध, उपक्रमशील आणि तितकीच उपयुक्त संस्था अशी प्रतिमा जनमानसात प्रस्थापित करण्यात स्वरूपानंद पतसंस्थेला यश आलं. स्वरूपानंद पतसंस्थेच्या व्यवहारांमध्ये असलेलं सातत्य, त्यातही सातत्याने वृद्धिंगत होणारी आकडेवारी प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून जनमानसात पसरू लागली. नेटके व्यवहार, शिस्तबद्ध, वक्तशीर आचरण यामुळे सभासदांच्या मनात विश्वासाची वृद्धी होत गेली आणि पाहता पाहता स्वरूपानंद पतसंस्थेचं विशाल अर्थविश्व उभं राहिलं.

स्वरूपानंद पतसंस्था ही सभासदांनी सभासदांसाठी चालवलेली व्यवस्था आहे. स्वतःची साधनं स्वतः उभी करून, त्यांचा योग्य विनियोग करणं, पैशांचं व्यवस्थापन काटेकोरपणे करणं, कर्जवितरण आणि त्याचबरोबर वसुली ही रथाची दोन्ही चाकं समान वेगाने दौडतील हे पाहण्याचं तंत्र आत्मसात केल्याने प्रवासात वेग आला. वेगवान अर्थकारण जर शिस्त, सचोटी, वक्तशीरपणा या कोंदणात ठेवलं, तर उत्तम आर्थिक रिझल्ट प्राप्त होतात, हे स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने वारंवार शाबित केलं आहे. सभासदांनी सहयोग देऊन १० हजार रुपयांच्या भांडवलावर सुरू झालेली ही संस्था केवळ स्वावलंबनाचा मार्ग अवलंबून ६६४ कोटी रुपयांचा संमिश्र व्यवसाय करती झाली. २२ हजारांच्या घरात ठेवखाती आणि १९ हजारांच्या घरात कर्जखाती स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे लेजर समृद्ध करत आहेत. याचा अर्थ सहकार क्षेत्रातली ही व्यवस्था ४१ हजार सभासदांना आर्थिक सेवा देण्याइतकी सक्षम झाली, असं म्हटलं तर ते अगदी समयोचित दिसेल. सभासदांना वेळोवेळी कर्जपुरवठा करणं, ठेवीदार-सभासदांना गुंतवणुकीच्या संधी देऊन ठेववृद्धी करत भांडवल उभारणं, उभारलेल्या ठेवींचं व्यवस्थापन करणं, प्रमाणबद्ध गुंतवणूक करणं, प्रमाणात कर्जवितरण करणं, वितरित कर्जांची नेटकी वसुली करणं, हे सर्व करण्यासाठी व्यवस्था उभारणं आणि व्यवस्था उभारताना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन रोजगारनिर्मिती करणं अशा विविध स्तरांवर स्वरूपानंद सहकारी पतसंस्था सातत्यपूर्ण काम करते आहे. सहकार क्षेत्राला अपेक्षित असल्यानुसार अत्यंत उपयुक्त योजना राबवून सभासदांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यासाठी स्वरूपानंद पतसंस्था सातत्याने कार्यरत आहे.

स्वरूपानंद पतसंस्थेतून होणारे आर्थिक व्यवहार सभासदांच्या गरजा भागवत असतात आणि हे करत असताना बाजारात पैशांचा पुरवठा वाढवण्याचं, व्यवसाय-उद्योग क्षेत्राला पतपुरवठा करण्याचं उपयुक्त साधन म्हणून ग्राहकांची क्रयशक्ती वाढवण्याचं काम स्वरूपानंद पतसंस्था करत असते. याचा अर्थ स्वरूपानंद पतसंस्थेच्या व्यवस्थेतून होणारे कोट्यवधींचे व्यवहार देशाच्या अर्थकारणात महत्त्वपूर्ण योगदान करत आहेत. स्वरूपानंद पतसंस्था शासनाची कोणतीही मदत न घेता गेली ३४ वर्षं कार्यरत असून, पतसंस्थेच्या अर्थकारणातून राष्ट्रीय संपत्तीत भर पडत आहे. पतसंस्थेच्या माध्यमातून भांडवलनिर्मिती, रोजगारनिर्मिती, भांडवल पुरवठा होत आहे. याच गोष्टी दरडोई उत्पन्न वाढवण्यासाठी उपयुक्त ठरतात. सरकारी यंत्रणेवरचा, व्यवस्थेवरचा ताण यातून कमी होतो. दुसरीकडे, सभासदांना आवश्यक सेवा देण्याची यंत्रणा कार्यान्वित होते. सहकाराचं हेच काम राष्ट्रीय धोरणनिर्मात्यांना अपेक्षित आहे. जागतिक क्रमवारीत चौथ्या स्थानावर अर्थकारण करणारी अर्थव्यवस्था ही कोणत्याही राष्ट्राला अभिमानास्पद ठरणारी गोष्ट आपल्या देशाने साध्य केली आहे. आता पुढचा टप्पा नजरेच्या टप्प्यात आला आहे. हे उच्चांक गाठण्यासाठी देशातील लहान-थोर सर्वच क्षेत्रांचं योगदान आहे. या महत्त्वपूर्ण योगदानात स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचाही खारीचा वाटा आहे, ही गोष्ट प्रत्येक सभासदाला अभिमान वाटावा अशी आहे. अशी अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या पतसंस्थेशी जोडलं जाण्याचा विचार करणाऱ्या ग्राहकांची संख्या वाढत असल्याने पतसंस्थेची व्याप्तीदेखील सातत्याने वाढत जात आहे.

**- ॲड. दीपक म. पटवर्धन**


स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था म., रत्नागिरी जिल्हा या पतसंस्थेचे 'स्वरूप सहकार' हे मासिक स्वरूपानंद प्रिंटिंग सर्व्हिसेस, लांजा येथे छापून प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२ येथे प्रसिद्ध केले.

**ऑक्टोबर २०२५. पाने १६. संपादक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **कार्यकारी संपादक :** अनिकेत कोनकर.

**मुद्रक, प्रकाशक :** ॲड. दीपक मनोहर पटवर्धन. **मांडणी आणि सजावट :** कोकण मीडिया, एटीएमएस ग्राफिक्स.

**संपादकीय पत्रव्यवहाराचा पत्ता :** प्रेसिडेन्सी बिझनेस हाउस, एस. टी. स्टँडसमोर, रत्नागिरी-४१५६१२. संपर्क : (०२३५२) २२१२६३/२९५३६३.

**वेबसाइट :** https://swaroopanandpatsanstha.com/ **ई-मेल :** swaroopsahakarrtn@gmail.com.

**This Monthly Swaroop Sahakar printed and published by Adv. Deepak Manohar Patwardhan, on behalf of Swami Swaroopanand Sahakari Patsanstha Ltd., Ratnagiri and printed at Swaroopanand Printing Services, Lanja and published at Presidency Business House, Opp. S. T. Stand, Ratnagiri-415612. Editor: Adv. Deepak Manohar Patwardhan. Executive Editor: Aniket Konkar. October 2025.**









# स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या शिस्तबद्धतेचा आदर्श अन्य सहकारी संस्थांनी घ्यावा : प्रवीण दरेकर

**रत्नागिरी :** 'मी अनेक संस्था सहकारी संस्थांचे कामकाज पाहिले आहे, स्वतःही काही संस्था चालवल्या आहेत; मात्र स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेप्रमाणे प्रमाणबद्ध आणि आर्थिक शिस्त पाळून व्यवहार करणारी, तसंच निर्धारित प्रमाणबद्धतेनुसार काम करणारी अन्य सहकारी संस्था महाराष्ट्रात पाहिली नाही. पतसंस्थेचे अर्थकारण आदर्शवत आहे. संस्थेच्या कामकाजात असलेले सातत्य, आर्थिक शिस्त आणि प्रमाणबद्धता हा विषय दुर्मीळ आहे,' असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्य सहकारी संघाचे अध्यक्ष आणि स्वयं/समूह पुनर्विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष प्रवीण दरेकर यांनी काढले. रत्नागिरी दौऱ्यावर असताना दरेकर यांनी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या रत्नागिरीतील प्रधान कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्यांनी पतसंस्थेचे कामकाज जवळून पाहिले. तसेच, पतसंस्थेच्या कार्यपद्धतीबद्दल पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्याशी चर्चा करून जाणून घेतले.

प्रवीण दरेकर यांची राज्य सहकार संघाच्या आणि पुनर्विकास प्राधिकरणाच्या अध्यक्षपदी अलीकडेच नियुक्ती झाली असून, त्यांना मंत्रिपदाचा दर्जा मिळाला आहे. त्याबद्दल स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी शाल, देवी लक्ष्मीची प्रतिमा आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. या वेळी पतसंस्थेचे उपाध्यक्ष माधव गोगटे, अजित रानडे, शरदचंद्र लेले आदी संचालक, तसेच मुन्ना चवंडे, सचिन करमरकर, राजू तोडणकर आदी मान्यवर उपस्थित होते.

दरेकर म्हणाले, 'स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या व्यवहारातील सातत्य वाखाणण्यासारखे आहे. या सातत्यामुळेच संस्थेची आर्थिक ताकद वाढली असून, ही बाब अन्य सहकारी पतसंस्थांसाठी निश्चित अनुकरणीय आहे.' दरेकर यांनी पतसंस्थेचे कौतुक करतानाच पतसंस्थेच्या या तज्ज्ञतेचा उपयोग सहकार क्षेत्राच्या विकासासाठी होऊ शकेल, असा विश्वास अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांच्याकडे व्यक्त केला.

'सहकार क्षेत्रात काम करत असताना स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या माध्यमातून प्रक्रिया उद्योग करणाऱ्या छोट्या सहकारी संस्था निर्माण करण्यासाठी प्रयत्न करावेत. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होऊन विकासाला चालना देण्यासाठी सहकार क्षेत्राचे योगदान वाढेल. यासाठी स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने विश्वासार्ह समन्वयक म्हणून काम करावे. अशा विविध घटकांना एकत्र आणून पतसंस्थेने त्यांना मार्गदर्शन करावे. तसेच, आवश्यकतेनुसार पतपुरवठाही करावा. या कामी आवश्यक ती सर्व मदत केली जाईल. मुंबई मध्यवर्ती सहकारी बँकेच्या माध्यमातूनही याकरिता सहकार्य केले जाईल,' असा शब्द दरेकर यांनी दिला.

'कोकणात सहकार रुजत नाही, असे नॅरेटिव्ह पसरवले जाते; मात्र ते पुसून काढण्यासाठी आपण सगळे मिळून काम करू या,' असे आवाहन दरेकर यांनी केले. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सोनेतारण कर्जाच्या वितरणासाठी अत्याधुनिक आणि कमीत कमी वेळेत कार्यवाही होणारी यंत्रणा उभारली आहे. त्याद्वारे सोनेतारण कर्जाचे वितरण कसे केले जाते, ते दरेकर यांनी प्रत्यक्ष पाहणी करून जाणून घेतले. ग्राहकांशी संवाद साधला. ही कार्यपद्धती अत्यंत प्रभावी असल्याचे कौतुकोद्गार काढतानाच, मुंबई मध्यवर्ती सहकारी बँकेतही आपल्याला अशी कार्यपद्धती अवलंबायला आवडेल आणि त्याकरिता बँकेच्या अधिकाऱ्यांना पतसंस्थेचे कामकाज पाहायला पाठवतो, असेही दरेकर यांनी सांगितले.

पतसंस्थेने सुरू केलेल्या 'स्वरूप सहकार' या मासिकाच्या संकल्पनेचीही दरेकर यांनी प्रशंसा केली आणि त्याबद्दल अधिक माहिती घेतली. पतसंस्थेची उत्तम वसुली, दणदणीत स्वनिधी, संस्थेचा निव्वळ नफा या संदर्भाने दरेकर यांनी ॲड. पटवर्धन यांचे खास अभिनंदन केले. संस्थेच्या काही मागण्या, कर्जमर्यादा वाढ, पोटनियम दुरुस्ती या संदर्भातील अडचणी समजून घेऊन दरेकर यांनी थेट आयुक्तांशी चर्चा केली आणि संस्थेच्या मागण्या मान्य करण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले.

# ‘साधनांचा सर्वोत्तम उपयोग हाच स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या यशाचा खरा मानदंड’



**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या ठेव योजनांना गुंतवणूकदारांचा नेहमीच चांगला प्रतिसाद मिळतो. तसंच, सोनेतारण कर्ज आणि अन्य प्रकारच्या कर्जयोजनांचा लाभही मोठ्या प्रमाणावर ग्राहक घेतात. या योजना राबवताना, त्यांची अंमलबजावणी करताना नेमका कशा प्रकारे विचार केला जातो, धोरणांची आखणी कशी केली जाते, उद्दिष्ट कसं निश्चित केलं जातं आणि ते गाठण्यासाठी कसे प्रयत्न केले जातात, याबद्दलचं कुतूहल अनेक ग्राहकांच्या मनात असतं. ते कुतूहल शमवण्याच्या उद्देशाने अनिकेत कोनकर यांनी घेतलेली पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांची ही प्रदीर्घ मुलाखत...**

**▸ प्रश्न : स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेची दसरा-दिवाळी ठेव योजना नुकतीच पार पडली. नेहमीप्रमाणेच संस्थेच्या या योजनेला गुंतवणूकदारांचा चांगला प्रतिसाद मिळाला. एकंदरीतच पतसंस्थेची वाटचाल आणि ग्राहकांचा विश्वास याबद्दल तुम्ही नोंदवलेली निरीक्षणं काय आहेत?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेला गुंतवणुकीचं साधन म्हणून समाजाने मान्यता दिली आहे. स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या प्रत्येक योजनेमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत असते. केवळ १० हजार रुपयांच्या भांडवलावर संस्थेने सुरुवात केली होती. तो आकडा आता चारशे कोटी रुपयांच्या जवळ आला आहे. पतसंस्थेच्या ग्राहक सभासदांची संख्या सुरुवातीला केवळ ३०० एवढीच होती. ती आता ४८ हजारांपर्यंत पोहोचली आहे. या सगळ्याचा आढावा घेतला तर असं लक्षात येतं, की स्वरूपानंद पतसंस्थेतल्या गुंतवणुकीकडे लोकमानसाकडून विश्वासार्ह साधन म्हणून पाहिलं जातं. स्वाभाविकपणे स्वरूपानंद पतसंस्थेत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली जाते. गुंतवणुकीचा पॅटर्न पाहिल्यावर असं लक्षात येतं, की रत्नागिरी शहरातल्या शाखांमध्ये होणारी गुंतवणूक सर्वाधिक



## प्रश्न : पतसंस्था कर्जधोरण कशा प्रकारे ठरवते?

**ॲड. दीपक पटवर्धन :** कर्जांची मागणी वेळोवेळी बदलत असते. उदाहरण द्यायचं झालं, तर ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये आपल्याकडच्या आंबा व्यावसायिकांचे करार किंवा विविध उपक्रम सुरू होत असतात. त्यामुळे या काळात त्यांच्यासाठी कर्जाची गरज मोठी असते. दसरा-दिवाळीच्या दरम्यान वाहनांची खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. त्यासाठीही मोठ्या प्रमाणावर कर्ज लागतं. याच हंगामात मोठमोठ्या प्रमाणावर फ्लॅट बुकिंग होत असतं. त्यातही दोन प्रकार आहेत. काही वेळा फ्लॅटखरेदीच्या संपूर्ण रकमेसाठी गृहकर्जाची मागणी वाढलेली असते. काही वेळा फरकाची रक्कम भरण्याकरिताही ग्राहक कर्जाची मागणी करतात. काही ठिकाणी व्यावसायिक उपयोगाकरिता वाहनं खरेदी करण्याकरिता कर्जाची मागणी वाढलेली असते. १५ ऑगस्टच्या नंतर मच्छिमार समाजाकडून मोठ्या प्रमाणावर कर्जाची मागणी होते. कारण त्या वेळी मासेमारीचा हंगाम सुरू होत असतो. जून महिन्याचा विचार केला, तर शेतकरी बांधवांकडून वेगवेगळ्या प्रकारच्या कर्जाची मागणी होत असते. अशा प्रत्येक काळानुरूप या वेगवेगळ्या प्रकारच्या कर्जमागण्या संस्थेकडे होत असतात. बाजारपेठेत कोणत्या प्रकारच्या प्रॉडक्टला मागणी आहे, हे लक्षात घेऊन त्या अनुषंगाने पतसंस्था आपलं कर्जधोरण ठरवत असते. या सर्व कर्जधोरणामुळे आजपर्यंतच्या ३४ वर्षांत केलेल्या व्यवहारांचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. या संदर्भात तपशीलवार माहिती संस्थेकडे तयार असते. या माहितीचा सातत्याने अभ्यास केला जातो. कोणत्या महिन्यात कोणत्या प्रकारचं कर्ज अधिक लागू शकतं, याचा अंदाज या माहितीवरून येऊ शकतो. त्यामुळे या माहितीचं विश्लेषण, त्यावर आधारित घेतलेला निर्णय, बाजारपेठेत असलेली प्रत्यक्ष मागणी या सगळ्याचा तौलनिक अभ्यास करून कर्जधोरण ठरवलं जातं. कोणत्याही क्षणी कर्ज आणि ठेवी यांच्यामधलं प्रमाण योग्य राहणं गरजेचं असतं. एकूण ठेवींच्या प्रमाणात विचार करता ६० ते ७० टक्के एवढं कर्ज वितरित व्हावंच लागतं. तरच संस्थेला योग्य पद्धतीचं उत्पन्न प्राप्त होतं. कारण कर्जावर मिळणारं व्याज हेच पतसंस्थेचं मोठं उत्पन्न असतं.

आहे. कारण पतसंस्थेच्या तीन शाखा रत्नागिरी शहरात आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भागातल्या शाखांमध्येही प्रत्येक योजनेला उत्कृष्ट प्रतिसाद मिळाल्याचं आपल्याला दिसतं. सर्वच शाखा आणि त्यामधल्या ठेवी १० कोटी रुपयांच्या आसपास पोहोचलेल्या दिसतात. रत्नागिरीतल्या प्रधान कार्यालयात १०० कोटी रुपयांपेक्षा अधिक ठेवी आहेत. मारुती मंदिरच्या शाखेमधल्या ठेवी १०० कोटी रुपयांच्या आसपास पोहोचल्या आहेत. त्याचप्रमाणे पावस, कुवारबाव, जाकादेवी, मालगुंड अशा सर्वच शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक पाहायला मिळते. ठेवीदार जेव्हा एवढ्या मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करत असतात, तेव्हा ते संस्थेबद्दल माहिती घेत असतात.

## प्रश्न : पतसंस्थेत ठेव ठेवण्यापूर्वी/ गुंतवणूक करण्यापूर्वी गुंतवणूकदारांनी किंवा कर्ज घेण्यापूर्वी ग्राहकांनी नेमक्या कोणत्या गोष्टींची माहिती घ्यायला हवी? या बाबतीत स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचे वेगळेपण काय सांगता येईल?

**ॲड. दीपक पटवर्धन :** संस्थेच्या ठेव योजना, ठेवींवरचा व्याजदर यांकडे ठेवीदारांचं लक्ष असतं; पण या सकृद्दर्शनी दिसणाऱ्या गोष्टी झाल्या. केवळ ठेवींचा व्याजदर एवढ्यावरच विसंबून न राहता संस्थेच्या अर्थकारणाचा पॅटर्न गुंतवणूकदारांनी समजून घेणं मला अधिक महत्त्वाचं वाटतं. मी अनेक वेळा अनेक वित्तसंस्थांच्या जाहिराती बघतो. त्यांनी वितरित केलेली माहितीपत्रकं पाहतो. त्यांची मांडणी अत्यंत आकर्षक स्वरूपात असते. अशा अनेक वित्तसंस्था केवळ त्यांच्याकडे संकलित होणाऱ्या ठेवींचा आकडा देतात. त्याचबरोबर त्यांनी गुंतवणूक कुठे केलेली आहे, किती केलेली आहे, कोणत्या प्रकारचं कर्जवितरण त्यांनी केलं आहे, कोणत्या प्रकल्पामध्ये त्यांनी पैसे गुंतवले आहेत, दिलेल्या कर्जाची वसुली सातत्याने किती आहे, या बाबींवर प्रकाश टाकला जात नाही. कदाचित त्यांचा तो बिझनेस पॅटर्न असेल किंवा त्यांचं ते धोरण असेल. त्यांना फक्त ठेवींवर लक्ष केंद्रित करायचं असेल किंवा लोकांनी फक्त ठेवींवरच लक्ष केंद्रित करावं असा त्यांचा हेतू असू शकेल. त्या बिझनेस पॅटर्नबद्दल मला बोलायचं नाही; पण स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने आजपर्यंत ज्या ज्या वेळेला जाहीर प्रकटन केलं, त्या प्रत्येक वेळी पतसंस्थेने आपल्याकडे जमा होणाऱ्या ठेवी किती आहेत हे सांगितलं. ग्राहकाला संस्थेच्या ठेव योजनांमध्ये गुंतवणूक करण्याकरिता प्रवृत्त करण्यासाठी आवश्यक असलेली माहिती आम्ही सातत्याने दिली. संस्थेने केलेलं कर्जवितरण किती, येणं कर्ज किती आहे, संस्थेची वसुली कशा पद्धतीने विक्रमी आहे, संस्थेने केलेली गुंतवणूक किती आहे, संस्थेचा नफा किती आहे, संस्थेचा स्वनिधी कशा पद्धतीने वाढत जात आहे, या संदर्भातील माहिती संस्थेने आवर्जून प्रत्येक वेळी जाहीर केल्याचं आपल्याला दिसेल. संस्थेची एकंदर आर्थिक स्थिती काय आहे, याबाबत ठेवीदारांना, संस्थेच्या ग्राहक सभासदांना पूर्णांशाने माहिती असावी आणि या सांख्यिकी आकडेवारीवर विसंबून, त्या आकडेवारीचा तौलनिक अभ्यास करून संस्थेमध्ये विश्वासार्ह पद्धतीने गुंतवणूक व्हावी, असा या प्रकटनामागे माझा हेतू सातत्याने राहिलेला आहे.

## प्रश्न : स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था वर्षभरात तीन ठेव योजना राबवते. त्यामागे नेमका काय विचार असतो?

**ॲड. दीपक पटवर्धन :** जूनमध्ये ठेववृद्धी मास योजना राबवली जाते. नंतर ऑक्टोबरच्या आसपास दसरा-दिवाळी ठेव

योजना येते आणि त्यानंतर लगेचच जानेवारी महिन्यात नववर्ष स्वागत ठेव योजना येते. सातत्याने एवढ्या मोठ्या ठेव योजना पतसंस्थेकडून का आणल्या जातात, असं ग्राहकांना स्वाभाविकपणे वाटणं शक्य आहे. कारण या योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर ठेवी गोळा होतात. पतसंस्थांनी प्रामुख्याने ठेवींच्या माध्यमातून निधी उभारून त्या निधीतून विविध प्रकारची कर्जे सभासद-ग्राहकांना वितरित करावीत, हा संस्थेचा मुख्य उद्देश असतो किंवा हाच व्यवसाय पतसंस्थांनी करायचा असतो. ज्या वेळी आपण मोठ्या प्रमाणावर ठेवी गोळा करतो, त्याच वेळी जमा होणाऱ्या ठेवींच्या प्रमाणात कर्जवितरण होणं अनिवार्य असतं आणि कटाक्षाने ते करावं लागतं. अन्यथा संस्थेकडे जमा होणारा ठेवरूपी निधी विषासमान होण्याची शक्यता असते. कारण त्या प्रत्येक ठेवीच्या प्रत्येक रुपयावर संस्थेला व्याज मोजावं लागतं. त्यामुळे संस्थेला उत्पन्न प्राप्त करायचं असेल, तर कर्जवितरण करण्याला पर्याय नाही. कारण त्याशिवाय संस्थेला उत्पन्न मिळतच नाही. त्यामुळे जेव्हा ठेवी मोठ्या प्रमाणावर गोळा केल्या जातात, त्या त्या वेळी त्याच प्रमाणात कर्जवितरण करण्याचं नियोजन संस्थेला करावं लागतं. सर्व ठेवीदारांपर्यंत संस्थेचे प्रतिनिधी पोहोचून संपर्क साधतात. काही वेळा दिलेल्या जाहिराती, संस्थेची असलेली माहिती या माध्यमातून ठेवीदार संस्थेकडे येत असतात. हा एक रचनात्मक प्रयत्न असतो. त्याला प्रतिसाद मिळत असतो.

**▸ प्रश्न : हे झालं ठेवी मिळवण्याच्या प्रयत्नांबद्दल; पण मग कर्जवितरणासाठी पतसंस्थेकडून काय प्रयत्न केले जातात? संस्थेच्या कर्जवसुलीचं प्रमाण चांगलं राहण्यासाठी कर्ज देताना काय काळजी घेतली जाते?**

ॲड. दीपक पटवर्धन : ज्या पद्धतीने ठेवी मिळवण्यासाठी ठेवीदारांशी संपर्क साधला जातो, त्याच पद्धतीने चांगले कर्जदार शोधण्यासाठीही संस्था अभियान राबवते. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने सातत्याने चांगल्या प्रकारच्या फिजिबल कर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे कर्जपुरवठा केला आहे. फिजिबिलिटी स्टडी (व्यवहार्यतेचा अभ्यास) योग्य पद्धतीने होत असल्यामुळे संस्थेची कर्जं चांगल्या पद्धतीने वसूल झाल्याचं आपण पाहतो. संस्थेची वसुली सातत्याने ९९.५० टक्क्यांच्या वर राहिली आहे. कर्जवितरण करताना अत्यंत डोळस दृष्टिकोन ठेवून वास्तवतेचा विचार करून, कर्जदाराच्या परतफेडीच्या क्षमतेचा अभ्यास करून त्या माध्यमातून दिलेलं कर्ज हे याचं मुख्य कारण आहे, असं मी म्हणेन.




**▸ प्रश्न : पतसंस्थेकडे होणाऱ्या सोनेतारण कर्जव्यवहारांचं प्रमाण मोठं आहे. गेल्या काही काळात सोन्याच्या किमतीमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. त्याचा सोनेतारण कर्जव्यवहारांवर कसा परिणाम होतोय किंवा होईल, असं तुम्हाला वाटतं?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** अलीकडच्या चार-सहा महिन्यांत किंवा जवळपास वर्षभराच्या काळात सोन्याच्या किमतीमध्ये सातत्याने वाढ होताना आपल्याला पाहायला मिळते. सहा महिन्यांपूर्वी- वर्षभरापूर्वी जे सोनं ७० ते ८० हजार रुपयांपर्यंत होतं, ते आता एक लाख २६ हजार रुपयांपर्यंत पोहोचल्याचं आपल्याला दिसतं. सोन्याच्या दरात प्रचंड वेगाने वाढ होत आहे. ही खरं तर पतसंस्थेसाठी मोठी संधी आहे, असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. सोन्याच्या दरात वाढ झाली, की संस्थेकडचा सोनेतारण कर्जव्यवहारही वाढल्याचं आपल्या लक्षात येतं. सोन्याच्या वाढीव किमतीच्या प्रमाणात सोनेतारण कर्जाची रक्कमही वाढीव मिळते. ग्राहक संस्थेकडे संपर्क साधतात आणि सांगतात, की 'आम्ही सहा महिन्यांपूर्वी सोन्याचा ऐवज तुमच्याकडे तारण ठेवला आहे. त्या ऐवजाची तुम्ही त्या वेळी केलेली किंमत अमुक एवढी आहे; पण आज त्या किमतीमध्ये बाजारभावाप्रमाणे जवळजवळ चाळीस हजार रुपयांची वाढ झाली आहे. ही वाढ लक्षात धरून आम्हाला कर्जाचं नूतनीकरण करून द्या. आमच्या सोन्याचं परत एकदा मूल्यांकन करा आणि नवीन बाजारभावानुसार अतिरिक्त रक्कम आम्हाला द्या.' अशी मागणी मोठ्या प्रमाणावर आणि सातत्याने येत असते. त्यामुळे सोनेतारण कर्जव्यवहार मोठ्या प्रमाणावर वाढत असतो.

**▸ प्रश्न : स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या सोनेतारण कर्जसुविधेची वैशिष्ट्यं किंवा वेगळेपणा काय आहे?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** सोन्याच्या

वाढत्या किमती हे सोनेतारण कर्जव्यवहार वाढण्यामागचं मूळ कारण असलं, तरी त्याचबरोबर स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या माध्यमातून सोनेतारण कर्ज वितरित करत असताना ग्राहकाची फसवणूक होणार नाही, त्या व्यवहारामध्ये पूर्ण पारदर्शकता राहील, अशा पद्धतीने रचना केलेली आहे. ग्राहकाकडून कोणत्याही प्रकारे अतिरिक्त व्याज घेतलं जाणार नाही, कर्जदाराची लुबाडणूक होणार नाही, अशा प्रकारची रचना स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेने केलेली आहे. सहकार क्षेत्राला अशाच प्रकारची रचना अपेक्षित आहे. त्याचबरोबर सोनेतारण कर्जदाराचा जो दागिना असेल, तो त्याने सोडवून न्यावा यासाठी पतसंस्था सातत्याने प्रयत्न, पाठपुरावा करत असते. तो दागिना लिलावात जावा, असा संस्थेचा कधीही हेतू नसतो. कारण तो दागिना परत ग्राहकाकडे गेला, तरच त्याच्यानंतर परत त्याच्या गरजेसाठी तो दागिना संस्थेकडे पुन्हा तारण ठेवू शकतो. तोच खरा तर संस्थेचा व्यवसाय आहे. सोनेतारण कर्जाकरिता संस्थेकडे आलेला दागिना पुन्हा कर्जदाराकडे जावा, अशीच संस्थेची सातत्याने अपेक्षा राहिलेली आहे. त्यासाठी संस्था प्रयत्न करत असते. अन्य खासगी संस्था आणि स्वरूपानंद सहकारी पतसंस्था यांमधला हा मूलभूत फरक आहे. ग्राहकाची कोणत्याही प्रकारची फसवणूक किंवा ओरबाडणूक आमच्या पतसंस्थेत होत नाही. ग्राहकाचा वेळ वाचावा, त्याला तात्काळ कर्ज मिळावं, यासाठीही आम्ही यंत्रणा तयार केली आहे. स्वाभाविकपणे त्याचा वेळ वाचतो, ग्रामीण भागातून कर्ज घेण्यासाठी आलेल्या ग्राहकाचा अर्धा दिवस वाचतो आणि तो त्याला परत कामासाठी उपलब्ध होऊ शकतो. या कारणांमुळे ग्राहक स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या शाखांमध्ये सोनेतारण कर्जासाठी मोठ्या प्रमाणावर येत असतात.

**▸ प्रश्न : सोन्याचं मूल्यांकन कसं केलं जातं? त्यासाठी कोणती यंत्रणा आहे?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** सोनं म्हटलं, की त्यात जोखीम आलीच. सोनेतारण कर्जव्यवसायामध्ये काम करणारी व्यवस्था विश्वासू असणं, संस्थेची कार्यपद्धती पारदर्शक असणं गरजेचं असतं. स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या प्रत्येक शाखेमध्ये स्वतंत्र सुवर्णकार पूर्ण वेळासाठी संस्थेने नेमलेला आहे. तो योग्य पद्धतीने सोन्याच्या ऐवजाची तपासणी करतो, सोन्याचा नेमका कस किती आहे हे नमूद करतो आणि आवश्यक वाटलं तर अधिक तांत्रिक गोष्टींचा फायदा घेऊन मशिनरीच्या साह्याने त्या सोन्याचं मूल्य तपासतो. या पद्धतीचा अवलंब स्वरूपानंद पतसंस्था सातत्याने करते. विश्वासार्ह पद्धतीने सोन्याचं तारण केलं जातं आणि त्याच्यावर कर्जवितरण केलं जातं. योग्य ती काळजी घेऊनच सोन्याचं मूल्यांकन केलं जातं. यासाठी पतसंस्थेमध्ये संपूर्ण संगणकीकृत व्यवस्था उभारण्यात आली आहे. एकदा ग्राहकाचं रेकॉर्ड तयार केलं, की संस्थेकडे ते कायमस्वरूपी राहतं. वेगवेगळ्या प्रकारचे फॉर्म संगणकाच्या रूपात भरता येतात. मानवी हस्तक्षेप कमीत कमी राहावा असा संस्थेचा प्रयत्न असतो. त्यामुळे स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेचा सोनेतारण कर्जाचा फोलिओ सातत्याने वाढता असल्याचं आपल्या लक्षात येतं.

**▸ प्रश्न : ग्राहकाच्या आणि पतसंस्थेच्या दृष्टिकोनातून सोनेतारण कर्जाकडे कसं पाहता येतं? या दोन्ही घटकांसाठी हे व्यवहार उपयुक्त ठरतात का?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** सोनेतारण कर्ज हे ग्राहकासाठी अत्यंत आवश्यक असलेलं कर्ज आहे. अत्यंत तातडीच्या गरजा सोनेतारण कर्जामधून भागवल्या जातात, हा सार्वत्रिक अनुभव आहे. ग्राहकाच्या अशा पद्धतीच्या तातडीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी सहकार क्षेत्रातील हे माध्यम उपयोगात येत आहे. कोणत्याही प्रकारची फसवणूक न होता, नियमांच्या परीघात राहून हे सगळं केलं जातं. त्यामुळे ग्राहकाच्या दृष्टीने हा विषय अत्यंत किफायती शाबित झालेला आहे. त्याचबरोबर पतसंस्थेलाही सोनेतारण कर्जाच्या माध्यमातून मोठं उत्पन्न प्राप्त होतं. संस्थेचा वाढीव नफा हा प्रामुख्याने सोनेतारण कर्जातून आलेला असतो. कारण सोन्याच्या ऐवजावर मिळणारं व्याज नियमित पद्धतीने संस्थेला मिळत असतं. त्याच्या वसुलीसाठी फार मोठी प्रक्रिया करावी लागत नाही. त्याच्यासाठी फार मोठं मनुष्यबळ खर्च करावं लागत नाही. या सगळ्याचा एकंदर फायदा संस्थेच्या उत्पन्न घटकावर होतो. त्या माध्यमातून पतसंस्थेला मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळत असतं. त्यामुळे सोन्याच्या वाढणाऱ्या किमतीचा लाभ एक प्रकारे ग्राहकालाही होतो आणि पतसंस्थेलाही होतो. तसा तो सातत्याने झालेला आहे हे सहजपणे लक्षात येतं.

**▸ प्रश्न : कर्जाचं धोरण ठरवताना कोणकोणत्या बाबी लक्षात घेतल्या जातात?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** कर्जाचं धोरण ठरवताना विविध गोष्टींचा ऊहापोह केला जातो. प्रत्येक गोष्टीसाठी किती प्रमाणात एक्स्पोजर लिमिट आहे, कोणत्या कर्जाची महत्तम मर्यादा किती आहे, या संदर्भात संस्थेला सहकार खात्याने दिलेले निर्देश पाळावे लागतात. कोणत्याही एकाच प्रकारच्या कर्जामध्ये फार मोठी गुंतवणूक करता येत नाही. एकूण कर्जांच्या प्रमाणात किती टक्के हाउसिंग लोन (गृहकर्ज) द्यावं, किती टक्के व्हेइकल लोन (वाहन कर्ज) द्यावं, वेगवेगळ्या प्रकारची कर्जं किती प्रमाणात द्यावीत, हे सहकार खात्याने नेमून दिलेलं असतं. त्याच्या बाहेर पतसंस्थेला जाता येत नाही. सगळीच अंडी एकाच परडीत ठेवून जो धोका निर्माण होतो, तो टाळण्याचा प्रयत्न संस्थेच्या पातळीवर सातत्याने केला जातो.

**▸ प्रश्न : स्वामी स्वरूपानंद पतसंस्थेच्या कर्जयोजनांबद्दल काय सांगाल?**

**▸ ॲड. दीपक पटवर्धन :** समाजाच्या असलेल्या गरजा लक्षात घेऊन, त्यांना अनुरूप अशा कर्जयोजना राबवल्या जातात. चांगले कर्जदार शोधण्याचं काम स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था करते. एक

महत्त्वाची गोष्ट म्हणजे, स्वामी स्वरूपानंद पतसंस्था जेवढ्या रकमेचं कर्ज मंजूर करते, तेवढी शंभर टक्के रक्कम कर्जदाराच्या हाती पडेल असा शिरस्ता आम्ही ठेवला आहे. त्यातून जाणीवपूर्वक कोणत्याही प्रकारची कपात केली जात नाही. त्यामुळे स्वरूपानंद पतसंस्थेच्या कर्जयोजना खूप किफायती असल्याचं व्यापारी वर्गात बोललं जातं. पतसंस्थेच्या कर्जयोजनांचे व्याजदर स्पर्धात्मक आहेत. बँकांचे व्याजदर आणि स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेकडून दिल्या जाणाऱ्या कर्जाचा व्याजदर यांमध्ये फार मोठी तफावत नाही. कर्जाचा व्याजदर कमीत कमी ठेवण्याकडे स्वरूपानंद पतसंस्थेचा कल असतो. त्यामुळे ज्यांची कागदपत्रं योग्य आहेत, अशा व्यक्ती स्वरूपानंद पतसंस्थेच्या कर्जयोजनांचा उचित लाभ घेऊ शकतात. त्यामुळे चांगले आणि नियमित परतफेड करणारे कर्जदार संस्थेला सहज प्राप्त करता येतात. संस्थेने वसुली यंत्रणा जागृत ठेवलेली असतेच. योग्य पद्धतीने पाठपुरावा केला जातो. सातत्याने आणि नियमित पाठपुरावा केल्यामुळे कर्जदाराच्या मनावर ही गोष्ट बिंबवली जाते, की स्वरूपानंद पतसंस्थेचा कर्जहप्ता नियमित भरणं आवश्यक आहे. या पद्धतीने सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यामुळे आमची वसुली उत्तम प्रकारे होते. कारण वसुली यंत्रणा पूर्ण वर्षभर सजग ठेवलेली असते.

**प्रश्न : स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था ठेव योजना जाहीर करताना दर वेळी उद्दिष्टही जाहीर करते. त्यामागे नेमका काय विचार असतो?**

**अॅड. दीपक पटवर्धन :** ज्या वेळी ठेवीदार किंवा गुंतवणूकदार स्वरूपानंद पतसंस्थेमध्ये गुंतवणूक करतात, त्या वेळी त्या गुंतवणुकीचा अंदाज घेऊन आम्ही त्या प्रमाणातच उद्दिष्ट निश्चित केलेलं असतं, की या ठेववृद्धी मासामध्ये १० कोटी रुपयांची ठेव संकलित केली जाईल किंवा पहिल्या ठेववृद्धी मासामध्ये २५ कोटी रुपयांच्या पुढचा टप्पा गाठायचा आहे वगैरे वगैरे... संस्थेची एकंदर स्थिती पाहून जानेवारीच्या ठेववृद्धी मासाचं उद्दिष्ट ठरवलं जातं. मनात येईल तो आकडा उद्दिष्ट म्हणून घोषित केला जात नाही. प्रत्येक आकड्याच्या मागे योग्य पद्धतीचा डेटा अभ्यासलेला असतो. परिस्थितीचा अभ्यास केलेला असतो. संस्थेची आर्थिक पत्रकं अभ्यासलेली असतात आणि त्या सगळ्याचा ऊहापोह करून नेमक्या किती लोकांपर्यंत आपण पोहोचू शकू, याचा अंदाज घेऊन ठेवींचं उद्दिष्ट ठरवलेलं असतं. त्यामुळे ते उद्दिष्ट ठेवीदार ठेवींची गुंतवणूक करून पूर्ण करतात, त्या वेळी एक वेगळा आनंद असा मिळतो, की आपण ज्या अपेक्षा ठेवल्या किंवा आपण जे उद्दिष्ट निश्चित केलं, ते उद्दिष्ट जनमानसापर्यंत पोहोचलंय आणि लोकांनी त्याच पद्धतीने आपल्याकडे गुंतवणूक केली आहे. निर्णय घेण्यामागचा हा पॅटर्न महत्त्वाचा असतो. तुम्ही एक निश्चित धोरण ठरवता, त्याला त्याच पद्धतीचा प्रतिसाद मिळतो, स्वाभाविकपणे त्याच पद्धतीने कर्जवितरणाचं धोरणही निश्चित करता येतं. या सगळ्या कृती एकमेकांच्या समन्वयाने कराव्या लागतात. त्यासाठी प्रत्येक घटकाचा योग्य पद्धतीने अभ्यास करावा लागतो. घडणाऱ्या प्रत्येक छोट्या-मोठ्या घटनांचा अभ्यास करावा लागतो. बाजारपेठेत असलेल्या परिस्थितीचा अभ्यास करावा लागतो. ग्राहकाच्या गरजेचा अभ्यास करावा लागतो. हा अभ्यास कधी शक्य आहे? या सगळ्या घटकांशी तुमचा संवाद होत असेल, तुम्ही या सगळ्यांच्या संपर्कात असाल, रोज चालणारे व्यवहार तुम्ही पाहत असाल, तरच त्यातून मिळालेल्या अनुभवातून या पद्धतीचे निर्णय घेणं सहज शक्य होतं. याच फॉर्म्युलाचा उपयोग करून स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आपलं गुंतवणूक धोरण ठरवते. गुंतवणूक धोरणाच्या अनुषंगाने संस्था आपलं कर्जधोरण ठरवते. या दोन्हींमध्ये योग्य प्रमाणबद्धता आणि सातत्य राखल्यामुळेच स्वरूपानंद पतसंस्थेकडे आज अग्रमानांकित पतसंस्था, उत्तम आर्थिक स्थिती असलेली पतसंस्था आणि समाजमान्यता मिळालेली पतसंस्था म्हणून पाहिलं जातं.

**प्रश्न : स्वरूपानंद पतसंस्थेच्या यशाचं गमक कशात आहे, असं तुम्हाला वाटतं? पतसंस्थेचं पुढचं उद्दिष्ट काय आहे?**

**अॅड. दीपक पटवर्धन :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे सगळे आर्थिक रिझल्ट्स उत्तम पद्धतीचे असतात. संस्थेचा स्वनिधी हा सगळ्यात महत्त्वाचा घटक असतो. आज हा स्वनिधी ५४ कोटी रुपयांपर्यंत पोहोचलेला आहे. संस्थेचा नफाही महत्त्वाचा असतो. कारण कोणत्याही आर्थिक संस्थेला नफा होणं आवश्यकच असतं. शिवाय तो प्रमाणबद्ध असणंही गरजेचं आहे. वर्किंग कॅपिटल अर्थात खेळत्या भांडवलाच्या प्रमाणात किमान एक टक्का नफा होणं आवश्यक आहे. स्वरूपानंद पतसंस्थेच्या बाबतीत हे प्रमाण दोन टक्क्यांवर जातं. हे विक्रमी प्रमाण आहे. कोणत्याही प्रकारची लुबाडणूक न करता आपल्याकडे उपलब्ध असलेला निधी किंवा पैसा योग्य पद्धतीने वापरात आणून, तो योग्य पद्धतीने कर्जाच्या रूपाने वितरित करून, योग्य पद्धतीने त्याची गुंतवणूक करून, त्याच्यावर जास्तीत जास्त परतावा मिळवण्याचा स्वरूपानंद पतसंस्थेचा प्रयत्न असतो. त्यामुळे कर्जाचे व्याजदर किमान ठेवून, ठेवींवर थोडासा अधिकचा व्याजदर देऊनही, प्रशासकीय खर्च मर्यादित करून, स्वरूपानंद पतसंस्थेला सातत्याने मोठ्या प्रमाणावर नफा होतो. आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनांचा सर्वोत्तम उपयोग हे त्यामागचं कारण. त्यातूनच आपण नफा मिळवतो. सहकार क्षेत्रात नफेखोरी करू नये असं उद्दिष्ट आहे. त्या उद्दिष्टाला कुठेही छेद न देता स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था आपले व्यवहार करत असते. साधनांचा सर्वोत्तम उपयोग हाच स्वरूपानंद पतसंस्थेच्या यशाचा खरा मानदंड आहे, असं मी म्हणीन. याच माध्यमातून आपल्याला पुढची धोरणं आखत सातत्याने भविष्याचा वेध घेत संस्थेला अधिक विकसित करत न्यायचं आहे. ३०० लोकांपासून सुरू झालेल्या अर्थकुटुंबात आज ४८ हजार जण आहेत. हे अर्थकुटुंब आता एक लाख लोकांचं कसं होईल या दृष्टीने आम्ही प्रयत्न करणार आहोत. त्या अनुषंगाने संस्थेची नवीन धोरणं आपण ठरवणार आहोत. ■

**स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेने 'अ' लेखापरीक्षण वर्ग मिळवण्याची परंपरा २०२४-२५ या आर्थिक वर्षातही कायम राखली आहे. सोबत हा ताजा लेखापरीक्षण अहवाल (ऑडिट रिपोर्ट) प्रसिद्ध करत आहोत.**

नमुना क्र. एन् - २

**वैधानिक लेखापरिक्षणाचा अहवाल**

(कलम ८१ आणि नियम ६९(३) नुसार)

प्रति

मा. सभासद

स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा

रत्नागिरी

संदर्भ : दि. ११/०८/२०२४ रोजीचे ठराव क्र. ८ प्रमाणे नेमणुकीचे पत्र

**वैधानिक लेखापरिक्षकांचा आर्थिक पत्रकांबाबत अहवाल**

१. आम्ही दि. ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ या कालावधीकरीता **स्वामी स्वरुपानंद सहकारी पतसंस्था मर्यादित रत्नागिरी जिल्हा** या संस्थेच्या सोबत जोडलेल्या आर्थिक पत्रकांचे लेखापरिक्षण केले असून सदर आर्थिक पत्रकांमध्ये दि. **३१/०३/२०२५** रोजीचा ताळेबंद, त्या दिनांकास संपणा-या वर्षाचे नफा तोटा पत्रक, महत्वाच्या हिशोब धोरणांचा सारांश आणि इतर स्पष्टीकरणात्मक माहिती यांचा समावेश होतो.

**आर्थिक पत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी**

२. महाराष्ट्र सहाकारी संस्था अधिनियम, १९६० आणि त्याखाली बनविलेले नियम या अन्वये सदर आर्थिक पत्रके तयार करण्याची जबाबदारी व्यवस्थापकीय मंडळाची असून त्यामध्ये आर्थिक पत्रके तयार करताना अंतर्गत नियंत्रण आराखडा व रचना तयार करणे, अंमलात आणणे व देखभाल करुन आर्थिक पत्रके तयार करणे की जेणेकरुन त्यामध्ये महत्वाची खोटी किंवा चुकीची माहिती / विधाने नसावित की जी त्रुटीने / चुकीने किंवा अफरातफरीने असोत.

**लेखापरिक्षकाची जबाबदारी**

३. आमच्या लेखापरिक्षणानुसार सदर आर्थिक पत्रकांबाबत अभिप्राय व्यक्त करणे ही आमची जबाबदारी आहे. दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया यांनी नेमून दिलेल्या आणि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० प्रमाणे लागू असणा-या प्रमाणकांप्रमाणे आम्ही लेखापरिक्षण केले आहे. सदर प्रमाणकांप्रमाणे आम्ही नितिमत्तेचे पालन करणे आणि आर्थिक पत्रके महत्वाच्या त्रुटी / चुकांपासून मुक्त आहेत याबाबत पुरेसे आश्वस्त होण्याकरीता लेखापरिक्षणाचे नियोजन आणि कार्य करावे लागते.

४. आर्थिक पत्रकांमध्ये नमूद केलल्या रक्कमा आणि माहिती याबाबत लेखापरिक्षण पुरावा गोळा करण्यासंबंधीच्या कार्याचा लेखापरिक्षणात समावेश होतो. फसवणूक अथवा चुकीमुळे होणा-या आर्थिक पत्रकांमधील दोषांबाबतच्या जोखमीचा अंदाजाप्रमाणे लेखापरिक्षण कार्यातील पद्धती निवडल्या जातात. सदर जोखमीचा अंदाज करताना, सद्य परिस्थितीत योग्य अशा लेखापरिक्षण कार्यपद्धती ठरविण्यासाठी संस्थेच्या आर्थिकपत्रके तयार आणि सादर करण्यासंबंधीच्या अंतर्गत नियंत्रणांचा विचार लेखापरिक्षकाकडून केला जातो. वापरलेल्या हिशोबातील धोरणांची योग्यता, व्यवस्थापनाने केलेले अंदाज आणि आर्थिक पत्रकांचे सर्वसाधारण सादरीकरण याबाबतच्या मूल्यांकनाचा देखील लेखापरिक्षणात समावेश होतो.

५. आमच्या लेखापरिक्षाणाच्या अभिप्रायाकरीता आम्ही मिळवलेला लेखापरिक्षणातील पुरावा पुरेसा आणि योग्य आहे असा आमचा विश्वास आहे.

**अभिप्राय**

६. आमच्या मते, आम्हाला मिळालेली माहिती आणि आम्हाला देण्यात आलेल्या स्पष्टीकरणांनुसार सदर हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१, इतर लागू असलेले अधिनियम,

निबंधकांनी जारी केलेली परिपत्रके यांना अनुसरुन आणि भारतात स्विकारलेली हिशोबाची मूलतत्वे यानुसार खालीलप्रमाणे खरी व सत्य स्थिती दर्शवितात -

१. ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०२५ रोजीची संस्थेची आर्थिक परिस्थिती

२. नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपलेल्या वर्षाचा नफा

**अन्य कायदे आणि नियामक बाबींवरील अहवाल**

७. महाराष्ट्र सहकारी संस्था अधियमातील तरतुदींनुसार ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक तयार करण्यात आलेले आहेत.

८. आम्ही अहवाल देतो की

(अ) आमच्या माहिती आणि समजुतीप्रमाणे लेखापरिक्षणाकरीता आवश्यक असणारी माहिती आणि खुलासे आम्हाला मिळाले आहेत आणि ते आम्हास समाधानकारक आढळेलेले आहेत.

(ब) आमच्या निदर्शनास आलेले संस्थेचे व्यवहार संस्थेच्या अधिकारात आहेत.

(क) संस्थेची कार्यालये आणि शाखांकडून मिळालेली माहिती लेखापरिक्षणाकरीता पुरेशी आढळलेली आहे.

९. आमच्या मतानुसार संस्थेचा ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संस्थेला लागू असणा-या लेखांकन मानांकनानुसार आहेत.

१०. आम्ही आणखी अहवाल देतो की-

१) या अहवालासंदर्भातील ताळेबंद आणि नफा तोटा पत्रक संस्थेची हिशोबपुस्तकांशी आणि माहितीपत्रकांबरोबर जुळणारे आहेत.

२) हिशोबाच्या पुस्तकांचे तपासणीनुसार संस्थेने अधिनियमानुसार आवश्यक असणारी हिशोब पुस्तके ठेवलेली आहेत.

३) आवश्यकतेनुसार शाखेच्या लेखापरिक्षकांनी दिलेले शाखांचे लेखापरिक्षण अहवाल आम्ही विचारात घेतेलेले आहेत.

४) चालू लेखापरिक्षण वर्षाकरीता संस्थेला "अ"लेखापरिक्षण वर्ग देण्यात आला आहे.

स्थान : रत्नागिरी

दिनांक : १४/०८/२०२५

UDIN : 25152642BMNPLF2408

For Kedar Karambelkar & Co LLP
Chartered Accountants
FRN – 138777W/W101091

Kedar Karambelkar
Partner
Membership No – 152642


# पतसंस्था परिवारातील वाढदिवस!

## सर्वांना वाढदिवसाच्या शुभेच्छा!

### ऑक्टोबर



हेमंत ग. रेडीज,
उपव्यवस्थापक
१३-१०-१९७९



पंकज मुकुंद सावंत
शाखाधिकारी, साखरपा शाखा
२८-१०-१९८९



हर्षल जयेंद्र सुर्वे
शाखाधिकारी, देवरूख शाखा
२३-१०-१९९१



ओंकार दीपक गोरे
शाखाधिकारी, खंडाळा शाखा
१९-१०-१९९२



ऋचा अभय बेहेरे
लिपिक, रत्नागिरी शाखा
३०-१०-१९८४



संदेश सुधाकर सुवरे
शिपाई, रत्नागिरी शाखा
१५-१०-१९८७

### नोव्हेंबर



**माधव गणेश गोगटे**
उपाध्यक्ष
२०-११-१९७०



**संतोष दिवाकर प्रभू**
संचालक
२१-११-१९६१



**राजेंद्र रामचंद्र सावंत**
संचालक
४-११-१९६२



धनंजय संजय वळंजू
शाखाधिकारी, मारुती मंदिर
शाखा- २२-११-१९८८



जयेश विलास जोशी
लिपिक, पावस शाखा
२३-११-१९९०



विनोद सुधाकर मजगावकर
चालक/शिपाई, मुख्य शाखा
२७-११-१९७३



प्रवीण शिवराम घाणेकर
शिपाई, पाली शाखा
२०-११-१९८४

# दसरा-दिवाळी ठेव योजनेला नेहमीप्रमाणे चांगला प्रतिसाद

**रत्नागिरी :** स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या दसरा-दिवाळी ठेव योजनेला दर वर्षीप्रमाणेच यंदाही चांगला प्रतिसाद मिळाला. त्याबद्दल पतसंस्थेचे अध्यक्ष अॅड. दीपक पटवर्धन यांनी आनंद व्यक्त केला असून, ठेवीदारांचे आभार मानले आहेत. यंदा २२ सप्टेंबर ते २३ ऑक्टोबर या कालावधीत ही ठेव योजना राबवण्यात आली. या कालावधीत ४९३ नवीन खात्यांच्या माध्यमातून




साडेआठ कोटी रुपयांच्या ठेवी पतसंस्थेत जमा झाल्या. त्यामुळे आता संस्थेच्या एकूण ठेवींचा आकडा ३८७ कोटी ७३ लाख ५५ हजार ३०० रुपये एवढा झाला आहे. पतसंस्थेने २७६ कोटी ८६ लाख ४९ हजार १३७ रुपयांची कर्जे वितरित केली असून, १७० कोटी रुपयांची बँक गुंतवणूक आहे. २३ ऑक्टोबर २०२५ अखेरची पतसंस्थेची संपूर्ण आर्थिक आकडेवारी या अंकाच्या पान क्रमांक १४वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. मार्च २०२५च्या अखेरीस संस्थेकडे असलेल्या ठेवी ३४६ कोटी २१ लाख रुपयांच्या होत्या. संस्थेची गुंतवणूक १४९ कोटी ३३ लाख रुपयांची होती, तर कर्जवितरण २५२ कोटी ६४ लाख रुपयांचे होते.

दसरा-दिवाळी ठेव योजनेच्या कालावधीत स्वरूपांजली ठेव योजनेसाठी (१२ ते १८ महिने) ७.७५ टक्के (सर्वसाधारण) आणि ८ टक्के (ज्येष्ठ नागरिक/महिला) एवढा व्याजदर देण्यात आला होता. तसेच, सोहम ठेव योजनेसाठी (१९ ते ३६ महिने) (मासिक व्याज) ८ टक्के (सर्वसाधारण) आणि ८.२५ टक्के (ज्येष्ठ नागरिक/महिला) एवढा व्याजदर देण्यात आला. एकरकमी पाच लाख रुपये आणि अधिक रकमेच्या ठेवींवर (१२ ते १८ महिने) साडेआठ टक्के एवढा व्याजदर देण्यात आला होता.

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेच्या शाखा

### रत्नागिरी जिल्हा

**रत्नागिरी :** दुसरा मजला, रत्नागिरी मध्यवर्ती एसटी स्टँडसमोर, प्रेसिडन्सी बिझनेस हाउस, रत्नागिरी - ४१५६१२, फोन : (०२३५२) २२१२६३, ९४०३५०६३६३

**मारुती मंदिर :** जोगळेकर संकुल, नाचणे रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी फोन : (०२३५२) २२३५७७, २९५६३५, ९४२०२९३५७४

**कोकणनगर :** २५, इंदू निवास, कोकणनगर स्टॉप, मजगाव रोड, नूर क्लिनिकशेजारी, रत्नागिरी, फोन : ९४२२५६३६०९

**कुवारबाव :** गाळा नं. ४, वसुंधरा कॉम्प्लेक्स, कुवारबाव, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५६१७, ९४२१५४१९११

**पावस :** रबिया कॉम्प्लेक्स, पावस बाजारपेठ, पावस, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २३७००३, २९५८६३, ९४२०४८७०९४

**जाकादेवी :** प्रमिला कॉम्प्लेक्स, तळमजला, जाकादेवी बाजारपेठ, जाकादेवी, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २५१४१८, २९५६६३, ९४०५५७६८२९

**खंडाळा :** अनंत कॉम्प्लेक्स, पहिला मजला, धारकर मेडिकलशेजारी, खंडाळा, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २४३२६३, ९४०५०२५००९

**मालगुंड :** लक्ष्मी भवन, नॉव्हेल्टी स्टोअरसमोर, मालगुंड बाजारपेठ, मालगुंड, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५७) २३५२०२, ९४०५०३७३०८

**पाली :** दळी शॉपिंग सेंटर, पाली बाजारपेठ, पाली, ता. जि. रत्नागिरी, फोन : (०२३५२) २९५८५३, ८२७५६७५४४०

**लांजा :** सद्गुरू कृपा, हॉटेल प्रसन्नशेजारी, आठवडा बाजार, लांजा, ता. लांजा, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५१) २९९०६०, ७५८८३००५८३

**राजापूर :** जी-२, दत्तसाई अपार्टमेंट, साई मंदिराजवळ, चव्हाणवाडी, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २३२०६३, ९४२२९६३०९३

**नाटे :** श्री. अमोल देवरूखकर यांचे घर, सडापेठ नाटे, ता. राजापूर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५३) २९५८६३, ९४०३०४६५३८

**साखरपा :** जुगाई कृपा, जुना बस स्टँड, साखरपा बाजारपेठ, साखरपा, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २९९१४७, ७५८८६६८११४

**देवरूख :** द्वारा श्री. श्रीरंग शिर्के, आपला बाजारच्या शेजारी, शिवाजी चौक, देवरूख, ता. संगमेश्वर, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५४) २६०२६३, ९४२११३८८३०

**चिपळूण :** लक्ष्मी गॅलॅक्सी, साउंड ऑफ म्युझिकसमोर, शिवाजी चौक, चिंचनाका, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी, फोन : (०२३५५) २५२७२८, ७५८८९३३८१०

### सिंधुदुर्ग जिल्हा

**देवगड-जामसंडे :** स्वरूप बिल्डिंग, जामसंडे बस स्टॉपजवळ, जामसंडे, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग - ४१६६१२, फोन : (०२३६४) २६१२६३, ७५८८९५८७९८

### पुणे जिल्हा

**कोथरूड :** शॉप नं. ३, मेघरंजनी अपार्टमेंट, लेन नं. ६, डहाणूकर कॉलनी, कोथरूड, पुणे - ४११०३८, फोन : (०२०) २५३८५४७०, ९४०४५४८१३८

## स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था, रत्नागिरी (कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य)

# २३ ऑक्टोबर २०२५ अखेरची आर्थिक स्थिती

| | |
|---|---|
| ठेवी | ३८७.७३ कोटी रुपये |
| कर्ज | २७६.८६ कोटी रुपये |
| गुंतवणूक | १७० कोटी रुपये |
| निव्वळ नफा | ५.९५ कोटी रुपये |
| खेळते भांडवल | ४६०.७८ कोटी रुपये |
| स्वनिधी | ५४.३१ कोटी रुपये |
| कर्जवसुली | ९९.६९ टक्के |
| सी. डी. रेशो | ६२.४८ टक्के |
| सीआरएआर | २८.४३ टक्के |








कराड (जि. सातारा) येथील सहकार भारती सहकार प्रशिक्षण सहकारी संस्थेने रायगड जिल्ह्यातील नागरी आणि बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी प्रशिक्षण शिबिर अलिबागमध्ये आयोजित केले होते. त्या शिबिरात उपस्थित असलेले विविध सहकारी पतसंस्थांचे अधिकारी, कर्मचारी आणि अन्य प्रशिक्षणार्थींना स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन यांनी पतसंस्थांचे पोटनियम या विषयाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या वेळी सहकार भारतीचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. उदय जोशी, संचालक अमित ओझे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.



ठाणे जनता सहकारी बँकेचे वरिष्ठ अधिकारी श्री. देवधर आणि सहकारी यांनी स्वरूपानंद पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली आणि कामकाजाची माहिती घेतली.



एचडीएफसी बँकेच्या रत्नागिरी शाखेचे व्यवस्थापक दिनेशकुमार कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वरूपानंद पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली.



रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे नवनियुक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. गिम्हवणेकर यांना पुढील वाटचालीकरिता शुभेच्छा देताना स्वरूपानंद पतसंस्थेचे अध्यक्ष ॲड. दीपक पटवर्धन आणि अधिकारी.



वाहन खरेदी कर्ज
प्रति लाख हप्ता
२११३/-*
(मुदत ५ वर्ष)
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com




२० मिनिटांत उपलब्ध!
जलद, सुलभ, किफायतशीर
सोनेतारण कर्ज
मर्यादा १ कोटी पर्यंत
अल्प व्याजदर *
ऐवजाचे जास्तीतजास्त व्हॅल्युएशन
तुमच्या ऐवजाची संपूर्ण सुरक्षितता
स्वामी स्वरूपानंद सहकारी पतसंस्था
मर्यादित रत्नागिरी जिल्हा | कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्य
प्रेसिडेन्सी बिझनेस हाऊस, २ रा मजला, एस.टी.स्टॅण्डसमोर, रत्नागिरी.
9403 506 363
www.swaroopanandpatsanstha.com